सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १६६ | सोमवार, दि. ९ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे
अभीष्टचिंतन





श्री. प्रशांत धमके
महसूल अधिकारी




श्री. रावसाहेब पाटील
अमळनेर

## कमिशनसाठी स्मशानभूमीसह विविध विकासकामांना ब्रेक

### आमदार अनिलदादा पाटील यांचा माजी आमदारांवर आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तुमच्या डोक्यावर मोठे कर्ज झाले. तुमची प्रॉपर्टी विकायला निघाली आहे. ते कर्ज फेडण्यासाठीच अमळनेरकरांनी पालिका तुमच्या ताब्यात दिली काय?असा सवाल आमदार अनिलदादा पाटील यांनी माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांना केला आहे. आम्ही मंजूर केलेली व पूर्णत्वास येत असलेली विकासकामे केवळ कमिशनसाठी थांबविली जात असल्याचा आरोपही आमदार अनिलदादा पाटील यांनी केला आहे.

याबाबत आमदार अनिलदादा पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, की स्मशानभूमीतील आवश्यकता लक्षात घेता मी नवीन दहन शेड मंजूर करून त्याचे कामही ठेकेदाराने वेगाने सुरू केले. मात्र, माजी आमदारांची सत्ता पालिकेत आल्यानंतर त्यांनी ठेकेदारास बिल अदा न केल्याने अंतिम टप्प्यात त्याचे काम थांबविले आहे. त्यामुळे अंत्यविधी बाहेर जमिनीवर होऊन प्रेतांची विटंबना होत आहे. केवळ कमिशनसाठी काम थांबविणे म्हणजे मृताच्या टाळूवरील लोणी खाण्याचाच हा प्रकार आहे. एकतर एकही विकासकाम तुम्ही आतापर्यंत आणू शकले नाहीत आणि आमदार अनिलदादा पाटील यांनी पालिकेच्या माध्यमातून काम आणले असेल तर ते कमिशनसाठी होऊ द्यायचे नाही. मोठ्या अथक प्रयत्नांनी मी २४ बाय ७ नवीन पाणीपुरवठा योजना मंजुर करून आणली. तिचे कामही सुरू केले. ते काम देखील कमीशनसाठी यांनी बंद पाडले आहे. शहरात आवश्यक त्या ठिकाणी नवीन रस्ते मी मंजूर केले असता तेथील कामे देखील यांनी कमिशनसाठी थांबवून ठेवली आहेत.

पालिका आपल्या ताब्यात आहे. त्यामुळे मर्जी असेल त्याच ठेकेदाराची बिले काढू, अमळनेरकरांच्या जीवावर मोठे कमिशन पदरात पाडून घेऊ आणि त्यातून आपले डोक्यावरील कर्ज फेडू असे मनसुबे माजी आमदारांचे असतील तर त्यांनी कोणत्याही भ्रमात राहू नये. यासंदर्भात विधानसभेत मी आवाज उठविणार असून विकासकामांची व न. प. फंडातील अत्यावश्यक सेवा पाणीपुरवठा रोजंदारी कर्मचाऱ्यांची बिले का काढली जात नाहीत? याची तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे करणार आहे. थांबविलेली विकासकामेही लवकरच पुन्हा सुरू होतील, असा विश्वास आमदार अनिलदादा पाटील यांनी व्यक्त केला आहे. केवळ स्वार्थासाठी आणि कमिशनसाठी विकासकामे थांबविण्याचे उद्योग बंद करून जनतेचे हाल त्वरित थांबवा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### मृत्यूतही मांडताय कमाईचे गणित..!

अंत्यविधीसाठी पालिकेमार्फत लाकडाएवजी मोफत गौरी पुरविण्याचा निर्णय पालिकेने घेतल्याचे समजले आहे. खरे पाहता यापूर्वीही पालिकेकडून अंत्यसंस्कारासाठी लागणारे लाकडांचे सरण मोफतच दिले जात होते. त्या सरणाची अंदाजे किंमत फक्त ३०० ते ५०० रुपये इतकी होती आणि त्यामध्ये साधारण ७ मण लाकूड मिळत होते. मात्र, आता त्याच सरणासाठी ५ हजार रुपयांचा ठराव करण्यात आल्याची चर्चा आहे. केवळ लाकडाएवजी गौरी पुरविली जाणार आहे. मात्र, ३०० ते ५०० रुपयांच्या सरणाचा खर्च थेट ५ हजार कसा? ही जनतेच्या कराच्या पैशांची लूट नाही का? असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे. गरीब कुटुंबासाठी अंत्यसंस्कार करणे हेच मोठे ओझे असते. अशा वेळी पालिकेने मदत करणे अपेक्षित असताना अचानक वाढवलेला खर्च हा नेमका कोणाच्या फायद्यासाठी? या निर्णयामागे मोठा आर्थिक घोटाळा किंवा भ्रष्टाचार असण्याची शक्यता नाकारता येत नाही. गौरीद्वारे खासगीतही अंत्यसंस्कार करायचे म्हटले तर अडीच तीन हजारांच्या वर पैसे लागत नाहीत. हे त्यापेक्षा कमी तर सोडाच तब्बल ५ हजारांचा ठराव करत असतील तर ते दुर्देवच आहे. म्हणजेच माणसाच्या मृत्यूतही जर कमाईचे गणित मांडले जात असेल, तर ही व्यवस्था नेमकी कोणासाठी? याचा खुलासा माजी आमदारांनी जरूर करावा, असे आवाहन आमदार अनिलदादा पाटील यांनी केले आहे.



अमळनेर : पिंपळे रस्त्यावरील नाल्याची स्वच्छता करून उघड्यावर टाकण्यात आलेला गाळ व काटेरी झाडेझुडपे. (छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

## पिंपळे नाल्याच्या साफसफाईला वेग

### गाळ काढल्याने नागरिक समाधानी; उघड्यावरील कचरा उचलण्याचीही मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पिंपळे रस्त्यावरील नाल्याची पालिकेतर्फे साफसफाई सुरू करण्यात आली आहे. जेसीबीच्या साह्याने गाळ काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. नागरिकांमध्ये काही प्रमाणात समाधान आहे. मात्र, उघड्यावर टाकण्यात आलेल्या गाळ, कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत आहे. हा गाळही लवकर उचलावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पिंपळे रस्ता हा मुख्य रहदारीचा मार्ग असल्याने हे कचऱ्याचे ढिगारे वारंवार नजरेस पडत आहेत. त्यातून दुर्गंधी पसरत असून कचरा सुकून वाऱ्यामुळे परिसरात उडत आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच हा कचरा पुन्हा गटारीत जाण्याची शक्यता देखील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, नाला, गटारीची साफसफाई करणे आवश्यक असले तरी त्यातून काढलेला कचरा तात्काळ उचलणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मात्र संबंधित विभागाकडून तो उचलण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे रस्त्याच्या कडेला पडून असलेले हे कचऱ्याचे ढिगारे नगरपालिका प्रशासनाने तात्काळ उचलावेत, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### नियमित स्वच्छता राखावी

पिंपळे रस्ता तसेच ढेकू रस्त्यावरील गटारींची नियमित स्वच्छता नसते. परिणामी पाणी तुंबून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरते. डासांची उत्पत्ती वाढते. पावसाळ्यात तर अत्यंत दयनीय अवस्था झालेली असते. परिणामी नाले व लहान- मोठ्या गटारींची नियमितपणे स्वच्छता करणे गरजेचे आहे. गटारी तुंबू नयेत याची काळजी घेणे अत्यंत महत्वाचे आहे. पालिकेने याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

### काटेरी झाडेझुडपेही काढावीत

पिंपळे रस्त्यासह शहरातील विविध भागातील मोकळ्या भुखंडांवर मोठ्या प्रमाणात गवत, काटेरी झाडे- झुडपे वाढली आहेत. अनेक प्लॉट हे रिकामे पडून आहेत. अशा प्लॉटधारकांचे मालक परगावी असल्याने त्यांचे याकडे दुर्लक्ष असते. मात्र, या वाढलेल्या झाडे- झुडपे व गवतामुळे डासांची उत्पत्ती वाढून रोगराईस निमंत्रण ठरत असते. याकडेही संबंधित विभागाने अशा मालकांना नोटीसा बजावून स्वच्छता ठेवणे गरजेचे आहे. स्वच्छ शहर- सुंदर शहर हे केवळ कागदावर न राहाता प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

## आहारातील बदलाने करा उन्हाचा मुकाबला!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : होळीनंतर उष्णताही वाढू लागली आहे. त्यामुळे या काळात आयुर्वेदात सांगितल्याप्रमाणे उन्हाळ्यात आपल्या 'लाइफ स्टाइल'मध्ये बदल केला तर उन्हाळाही आनंदात घालवू शकतो. वाढती उष्णता आटोक्यात ठेवण्यासाठी किंवा मुळात उष्णता वाढूच नये म्हणून उपचारापेक्षा प्रतिबंध चांगला हा मंत्रच लागू पडतो. त्यामुळे उन्हाळ्यात आहारातही बदल करणे क्रमप्राप्त ठरते.

जळजळ जाणवणे तसेच त्वचा रुक्ष कोरडी खरखरीत होणे, डोळ्याखाली काळी वर्तुळ, सुरकुत्या पडणारी त्वचा, कोरडी भुरभुरीत अजिबात चमक नसणारे केस, डोळे रखरखीत वाटणे, पापण्या उघडझाप करताना टोचल्यासारखे वाटणे, डोळे लाल होणे, ओढल्यासारखं वाटत राहाणे, हातपाय गरम जाणवणे, क्वचित प्रसंगी ओठांना, हाता-पायांना भेगा पडणे ही लक्षणे वाढती उष्णता दर्शवितात.

वातावरणातील उष्णता आणि घामाच्या धारांमुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत जाते. याचे तहान लागणं हे पहिल्यांदा दिसणारं लक्षण आहेच. शिवाय, थकवा येणं, पायात गोळे येणे, मांड्या भरून आल्यासारखं वाटणं, कोणत्याही कामात उत्साह न वाटणं, मरगळ जाणवणं, यूरिनला कमी होणं, उष्णता कमी ठेवणारा गुलाब आणि वाळा वाळ्याचं सरबत, वाळा घातलेलं पाणी याचा वापर शरीरात थंडावा ठेवतो. गुलाबाचे पाणी किंवा गुलाब पाकळ्यांची पेस्ट त्वचेवर लावल्यास त्वचा उजळते. डोळ्यांवर गुलाब पाणी पट्ट्या ठेवल्यास डोळ्यांची आग, लालसरपणा, डोळ्यांचा थकवा कमी होतो. पोटातून गुलकंद घेतल्यास पित्त, उष्णता कमी होते. थकवा कमी होतो. पोट साफ होऊन मूळव्याध यांसारख्या आजारांना अटकाव होतो.

शरीरात पाण्याचे प्रमाण राखणे गरजेचे शरीरात पाणी प्रमाणात राखण्यासाठी लिंबू, कोकम, आवळा सरबत, कैरीचे पन्हे, गोड ताक आदी पारंपरिक पेय घ्यावी. आंबा, फणस, जांभूळ, करवंद, बोरे, अशा रानमेव्यांचाही आस्वाद घ्यावा. मात्र, कितीही मोह झाला तरी कोल्ड्रिंक्स शक्यतो टाळा.

### आहाराबाबत कोणती काळजी घ्याल?

जेवताना उष्ण पदार्थ म्हणजे अगदी गरमागरम पदार्थ आणि अंगात उष्णता निर्माण करणारे पदार्थ, पोटात आग, जळजळ निर्माण करणारे पदार्थ खाण्याचे टाळणे आवश्यक आहे. गरम मसाल्याचे पदार्थ, हिरवी मिरची, भोपळी मिरची, आलं लसूण पेस्ट वापरून केलेले पदार्थ, चिली फ्लेक्स, तिखट तेलकट रस्सा तरी असणारे पदार्थ, आंबवलेले पदार्थ आपण टाळायला हवेत.

गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

### दिनविशेष

०९ मार्च

- कवी आणि लेखक डॉ. हरिवंशराय बच्चन यांना नवी दिल्लीत के. के. बिर्ला प्रतिष्ठानने आयोजित समारंभात पहिला सरस्वती पुरस्कार उपराष्ट्रपती यांच्या हस्ते देण्यात आला.
- यशवंत दिनकर पेंढारकर महाराष्ट्राचे कवी यांचा जन्म.
- युरी गगारीन पृथ्वीप्रदक्षिणा करणारे पहिले अंतराळवीर यांचा जन्म.

अभिमानास्पद..!

## रिक्षाचालकाचा मुलगा झाला चार्टर्ड अकाउंटंट

### कठोर परिश्रम, जिद्दीने कल्पेश बाविस्कर यांनी गाठले यशोशिखर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील कल्पेश दीपक बाविस्कर यांनी सी. ए. फायनल जानेवारी २०२६ परीक्षा उत्तीर्ण होवून प्रतिष्ठेची पदवी मिळवली आहे. अत्यंत साध्या कुटुंबातून आलेल्या कल्पेश यांनी कठोर परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. त्यांचे वडील हे रिक्षाचालक असून, त्यांचे स्वप्न साकार झाले आहे.

कल्पेश यांच्या कुटुंबात वडील, आई आणि तीन विवाहित बहिणी असा परिवार आहे. वडील रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, तर आई गृहिणी आहे. दिवस-रात्र कष्ट करून वडिलांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळली आणि मुलांच्या शिक्षणासाठी नेहमीच प्रयत्न केले. घरची परिस्थिती प्रतिकूल असली तरी कुटुंबातील सर्वांनी शिक्षणाला प्राधान्य दिले.

लहानपणापासूनच कल्पेश यांना शिक्षणाची आवड होती. काहीतरी मोठे करण्याची जिद्द मनात होती. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणाचा प्रवास सोपा नव्हता. अनेक अडचणी आणि आव्हाने समोर उभी राहिली. मात्र, त्यांनी कधीही हार मानली नाही. उलट परिस्थितीला सामोरे जात त्यांनी स्वतःला अधिक सक्षम बनवण्याचा निर्धार केला. उच्च शिक्षण सुरू ठेवण्यासाठी कल्पेश यांनी नोकरी करत अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. दिवसभर काम आणि त्यानंतर अभ्यास असा कठीण दिनक्रम त्यांनी स्वीकारला. नोकरीतून मिळणाऱ्या उत्पन्नातूनच त्यांनी सीएची परीक्षा फी तसेच क्लासेसची फी भरली. मर्यादित साधनसामग्री असूनही त्यांनी आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवून सातत्याने मेहनत घेतली. या संपूर्ण प्रवासात त्यांना सीए हेमराज जाधव, सीए पदमसिंह पाटील, सीए काबरा आणि एम. बी. यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. पानखिडकी, पाटीलवाडा, अमळनेर येथील रहिवासी असलेल्या कल्पेश बाविस्कर यांची ही यशोगाथा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

## जुन्या शाळा परिसराची स्वच्छता

### नगरसेविका कल्पना शर्मा यांची तत्काळ दखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : पांढरी शाळा परिसरातील स्वच्छतेप्रसंगी उपस्थित माजी नगरसेवक मुन्ना शर्मा व कर्मचारी.

अमळनेर : पालिकेतर्फे विद्यमान नगरसेविका सौ. कल्पना शर्मा यांच्या पुढाकाराने शनिवार, दि. ७ मार्च रोजी सर्वात जुनी शाळा असलेल्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. या परिसरातील इमारतीची अवस्था अत्यंत दयनीय असल्याने परिसर अस्वच्छ झाला होता.

या संदर्भात मिलिंद सोनार, सुनील शेठ (सत्यनारायण प्रिंटिंग प्रेस), नितीन उपाध्ये व चंद्रकांत महाजन यांनी परिसर स्वच्छ करण्याची मागणी केली होती. नागरिकांच्या मागणीची दखल घेत माजी नगरसेवक मुन्ना शर्मा यांनी तात्काळ मुकादम श्री. बाविस्कर यांना सूचना देऊन संबंधित ठिकाणी स्वच्छता करून घेतली. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## संपादकीय

# भारताची ठाम भूमिका

सध्याच्या जागतिक परिस्थितीकडे पाहिले असता जग अतिशय वेगाने बदलत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. राजकीय संघर्ष, आर्थिक स्पर्धा, ऊर्जा सुरक्षेचे प्रश्न, तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारी प्रगती आणि हवामान बदल यांसारख्या अनेक घटकांमुळे आंतरराष्ट्रीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनत चालली आहे. अशा बदलत्या वातावरणात भारताने स्वतःची स्वतंत्र, संतुलित आणि ठाम भूमिका स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही वर्षांत भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील उपस्थिती आणि प्रभाव लक्षणीयरीत्या वाढलेला दिसतो. जागतिक स्तरावर ऊर्जा हा आज सर्वात महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. औद्योगिक प्रगती आणि वाढती लोकसंख्या यामुळे ऊर्जा वापर प्रचंड वाढत आहे. भारतासारख्या वेगाने विकसित होत असलेल्या देशासाठी ऊर्जा सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची आहे. तेल, वायू आणि इतर इंधन स्रोतांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेल्या भारताने आपल्या राष्ट्रीय हिताला प्राधान्य देत ऊर्जा आयातीबाबत स्वतंत्र भूमिका घेतली आहे. जागतिक दबाव किंवा राजकीय समीकरणे यांच्यापेक्षा देशाच्या आर्थिक हिताला महत्त्व देणे ही परिपक्व राष्ट्राची खूण मानली जाते. ऊर्जा उपलब्धता आणि किमतीतील स्थिरता ही देशाच्या विकासासाठी अत्यावश्यक बाब आहे.

परराष्ट्र धोरणाच्या बाबतीतही भारताने संतुलित भूमिका स्वीकारली आहे. जगातील अनेक देश दोन किंवा अधिक गटांमध्ये विभागले जात असताना भारताने सर्वांशी मैत्रीपूर्ण आणि सहकार्यपूर्ण संबंध ठेवण्याचा मार्ग स्वीकारला आहे. एका बाजूला पाश्चात्य देशांशी आर्थिक व तांत्रिक सहकार्य वाढवले जात आहे, तर दुसऱ्या बाजूला पारंपरिक मित्र देशांशीही संबंध मजबूत ठेवले जात आहेत. ही बहुआयामी कूटनीती भारताच्या दीर्घकालीन हितासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. यामुळे भारताला जागतिक मंचावर अधिक विश्वासार्ह आणि जबाबदार देश म्हणून ओळख मिळत आहे.देशांतर्गत विकासाच्या बाबतीतही भारताने मोठी झेप घेतलेली दिसते. पायाभूत सुविधांच्या विकासाला सध्या मोठा वेग मिळत आहे. आधुनिक महामार्ग, नवीन रेल्वे प्रकल्प, विमानतळांचा विस्तार आणि डिजिटल पायाभूत सुविधा यामुळे देशाच्या विकासाचा वेग वाढत आहे. विशेषतः रेल्वे क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रवाशांसाठी अधिक जलद, सुरक्षित आणि आरामदायी सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. अशा प्रकल्पांमुळे केवळ प्रवास सोयीस्कर होत नाही, तर व्यापार, उद्योग आणि पर्यटनालाही चालना मिळते.

डिजिटल क्रांती हा भारताच्या प्रगतीतील आणखी एक महत्त्वाचा घटक ठरला आहे. इंटरनेट आणि मोबाइल तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे देशातील अनेक सेवा आता डिजिटल माध्यमातून उपलब्ध होत आहेत. डिजिटल व्यवहार, ऑनलाइन सेवा आणि स्टार्टअप संस्कृती यामुळे भारत जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे. नव्या पिढीतील उद्योजक आणि तंत्रज्ञान तज्ज्ञ देशाच्या अर्थव्यवस्थेला नवी दिशा देत आहेत.मात्र या सर्व सकारात्मक घडामोडींमध्ये काही गंभीर आव्हानेही दुर्लक्षित करता येणार नाहीत. महागाईचा वाढता दर हा सामान्य नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. अन्नधान्य, इंधन आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किमती वाढल्यामुळे मध्यमवर्ग आणि गरीब वर्गावर आर्थिक ताण वाढत आहे. त्यामुळे विकासाच्या धोरणांमध्ये सामाजिक समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक प्रगतीसोबतच सामान्य नागरिकांचे जीवनमान सुधारण्यावरही भर दिला गेला पाहिजे.हवामान बदल हा आणखी एक मोठा धोका बनत चालला आहे. अलीकडच्या काळात अनियमित पाऊस, उष्णतेच्या लाटा आणि नैसर्गिक आपत्तींची वारंवारता वाढताना दिसत आहे. याचा सर्वाधिक परिणाम शेती क्षेत्रावर होत आहे. देशातील मोठा वर्ग अजूनही शेतीवर अवलंबून असल्यामुळे पर्यावरणीय बदलांचा थेट परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो. त्यामुळे पर्यावरणपूरक विकास, जलसंधारण आणि अक्षय ऊर्जा यांसारख्या उपाययोजनांना अधिक प्राधान्य देणे आवश्यक ठरते.या सर्व परिस्थितीचा विचार करता भारत आज एका निर्णायक वळणावर उभा आहे. जागतिक पातळीवर प्रभाव वाढवण्याची मोठी संधी देशासमोर आहे. परंतु ही संधी योग्य प्रकारे वापरण्यासाठी स्थिर धोरण, दूरदृष्टी आणि सर्वसमावेशक विकासाची भूमिका आवश्यक आहे. केवळ आर्थिक वाढ पुरेशी नसून ती शाश्वत आणि समतोल असली पाहिजे.आजचा भारत केवळ वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था नसून जागतिक समीकरणांवर प्रभाव टाकण्याची क्षमता असलेला देश म्हणून उदयास येत आहे. ऊर्जा सुरक्षा, तंत्रज्ञान विकास, मजबूत कूटनीती आणि पायाभूत सुविधांचा विस्तार या सर्व गोष्टींचा योग्य समन्वय साधला गेला, तर भारत भविष्यात जागतिक नेतृत्वाच्या दिशेने निश्चितच पुढे जाईल.

# अतिवृष्टी, पूरग्रस्त शेतकरी कर्जमाफीपासून वंचित?

## 'त्या' घोषणेने वाढली चिंता; भूमिका स्पष्ट करण्याची सरकारकडे मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्य शासनाने शुक्रवार, दि. ६ मार्च रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली. ३० सप्टेंबर २०२५ रोजीपर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली. तर जे शेतकरी नियमित कर्जफेड करतात, त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचे जाहीर केले. मात्र, जून, जुलै आणि ऑगस्ट २०२५ मधील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळेल का, यावरून संभ्रम आहे. सरकारने याविषयी स्पष्ट भूमिका मांडावी, अशी शेतकरी मागणी करत आहेत.



गेल्यावर्षी राज्यात जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्यात पावसाने थैमान घातले होते. अतिवृष्टी आणि पूराने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यांना राज्य सरकारने मदत जाहीर केली होती. मात्र, ती मदत तुटपुंजी असल्याची ओरड झाली होती. विरोधकांनी सरकारवर हल्ला चढवला होता. आता सरकारने कर्जमाफी जाहीर करताना सप्टेंबरपासून ती लागू होणार आहे. म्हणजे त्यापूर्वी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना या योजनेपासून वंचित रहावे लागेल का, अशी चर्चा होत आहे. तर यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

अगोदर आस्मानी आणि नंतर सुलतानी संकटाने कोलमडल्याची ओरड शेतकऱ्यांमधून होत आहे. पूरग्रस्त आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकरी या कर्जमाफीपासून वंचित राहातील अशी भीती व्यक्त होत आहे. अतिवृष्टी आणि पूराने अनेक जिल्ह्यातील नदीकाठचे शेतकरी उद्ध्वस्त झाले. त्यांनी यापूर्वी मिळालेली मदत तुटपुंजी असल्याने नाराजी व्यक्त केली होती. उद्धव ठाकरे यांच्यासह विरोधकांनी त्यावेळी महाराष्ट्र पिंजून काढत सरकारवर जहरी टीका केली होती. सरकारने सरसकट मदत केली नाही. त्यावरून नाराजी पसरली होती. तर आता कर्जमाफी योजनेतही या शेतकऱ्यांच्या तोंडाला पानं पुसल्याचा आरोप करण्यात आला होता. बहुप्रतिक्षीत शेतकरी कर्जमाफीची घोषणा शुक्रवारी राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ३० सप्टेंबर २०२५ रोजीपर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर करण्यात आली. तर नियमीत कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचे जाहीर केले. त्याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल.

### मुख्यमंत्र्यांची काय ग्वाही?

दोन लाखांपर्यंत कुठलीही बँक असो, ज्यांना पीक कर्ज देण्याचा अधिकार आहे, अशा कोणत्याही बँकेने दिलेले पीक कर्ज राज्य सरकार माफ करणार आहे, असे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. ३० जूनपूर्वी आपण कर्जमाफी करणार आहोत. बजेटमध्ये कर्जमाफीची घोषणी केली आहे. आता पुढच्या कार्यवाहीला सुरूवात होईल. समिती यावर काम करत आहे. समिती आता याविषयीची माहिती देईल. जुन्या कुठल्याही कर्जमाफीपेक्षा चांगली ही कर्जमाफी असेल, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. त्यामुळे पूरग्रस्त आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ मिळेल का हे सरकारने स्पष्ट करावे अशी मागणी शेतकऱ्यांमधून करण्यात येत आहे.

# अमळनेरला महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जागतिक महिला दिनानिमित्त येथील सामर्थ्य प्रतिष्ठानतर्फे शासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांचा रविवार, दि. ८ मार्च रोजी सन्मान करण्यात आला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल माळी यांच्या हस्ते पोलीस उपनिरीक्षक कविता ठाणगे, महिला पोलीस नम्रता जरे मॅडम (दामिनी पथक), मोनिका पाटील यांच्यासह ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांची सेवा करणाऱ्या ग्रामीण रुग्णालयातील नर्सिंग अधिकारी अर्चना चंद्रकांत ढाले यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देवून सत्कार करण्यात आला.




*अमळनेर : पोलीस उपनिरीक्षक कविता ठाणगे, पोलीस नम्रता जरे व मोनिका पाटील यांचा सत्कार करताना सामर्थ्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल माळी.*

# उकाड्याने नागरिक हैराण, शीतपेयांची मागणी वाढली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथे व परिसरात उन्हाची तीव्रता चांगलीच वाढली आहे. उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. कडक उन्हामुळे शीतपेयांची मागणी वाढली आहे. विविध चौक, बाजारपेठ तसेच मुख्य रस्त्यांवर ऊसाचा रस, लिंबूपाणी, शिकंजी आणि आईस्क्रीम विक्रेत्यांकडे नागरिकांची मोठी गर्दी दिसून येत आहे.

मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात उन्हाचा चटका अधिकच जाणवू लागला आहे. ग्रामीण भागातून कामानिमित्त शहरात येणाऱ्या नागरिकांना उन्हापासून दिलासा मिळावा म्हणून ते मोठ्या प्रमाणावर थंड पेयांकडे वळत आहेत. त्यामुळे या व्यवसायिकांच्या विक्रीत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

विशेष म्हणजे, यंदा शहरात तसेच रस्त्यांच्या कडेला रसवंती केंद्रांची संख्याही वाढल्याचे दिसत आहे. दुपारच्या वेळी ऊसाचा रस आणि लिंबूपाणी स्टॉलवर ग्राहकांची चांगलीच गर्दी तसेच रांग लागलेली दिसते. तर लहान मुलांपासून ते तरुणांपर्यंत आईस्क्रीम, लस्सी आणि बदाम शेक यांचीही मोठी मागणी वाढली आहे. काही विक्रेत्यांनी सांगितले की, उन्हाळा सुरू होताच थंड पेयांच्या विक्रीत वाढ होते. मात्र यंदा तापमान लवकर वाढल्याने मागणीही अपेक्षेपेक्षा लवकर वाढली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी तात्पुरते स्टॉलही उभारले जात आहेत. दरम्यान, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर थंड पेय घेताना स्वच्छतेची काळजी घ्यावी. थंड पेयांचा दर्जा तपासून घ्यावा, शक्यतो दही, ताक, मठ्ठा आदींचा समावेश असावा, असा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे.



# राजीव मोटवानी : गुगलच्या यशामागचा भारतीय 'गुरू'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या घडीला गुगलवर दर सेकंदाला १ लाखाहून अधिक सर्च केले जातात आणि या अवाढव्य साम्राज्याचा पाया रचला होता एका भारतीय प्राध्यापकाने लिहिलेल्या केवळ २० पानांच्या एका रिसर्च पेपरने.

तुम्ही आज गुगलवर काहीही शोधले, तरी त्या निकालांमागे या एका माणसाची बुद्धिमत्ता दडलेली असते. त्यांचे नाव- राजीव मोटवानी. आयआयटी कानपूरचा हा हिरा ज्याने सिलिकॉन व्हॅलीचा चेहरामोहराच बदलून टाकला.

ही गोष्ट सुरू होते १९९० च्या दशकात. स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीच्या एका शांत खोलीत दोन तरुण पीएच.डी. विद्यार्थी एका विचित्र कल्पनेवर काम करत होते. लॅरी पेज आणि सर्गेई ब्रिन. त्यांना इंटरनेटवरची माहिती शोधण्यासाठी काहीतरी नवीन करायचे होते. पण त्या काळी सर्च इंजिन म्हणजे निव्वळ गोंधळ होता. या दोघांना योग्य दिशा देणारा कुणीतरी हवा होता. तेथे एंट्री झाली राजीव मोटवानी यांची. राजीव हे मूळचे जम्मूचे, पण त्यांचं शिक्षण दिल्ली आणि कानपूरमध्ये झाले होते. गंमत म्हणजे ते बॉलीवूडचा बादशहा शाहरुख खानचे शालेय मित्र होते. पण त्यांचे जग होते अल्गोरिदम्सचे. कल्पना करा, लॅरी आणि सर्गेई त्यांच्याकडे 'बॅकरब' नावाचा एक प्रोजेक्ट घेऊन आले. नाव ऐकूनच हसू येते ना? पण राजीव यांनी त्या नावाकडे दुर्लक्ष केले आणि त्यामागच्या कल्पनेचे सोने ओळखले. त्यांनी या दोन मुलांसोबत बसून 'पेजरँक' नावाचा अल्गोरिदम लिहिला. हा तोच अल्गोरिदम आहे ज्याने ठरविले की कोणती वेबसाईट महत्त्वाची आहे आणि कोणती नाही. आज आपण गुगलवर जे काही पाहतो, त्याचे 'रँकिंग' याच सूत्रावर आधारित आहे. राजीव फक्त त्यांचे शिक्षक नव्हते, तर ते गुगलचे पहिले सल्लागार आणि मार्गदर्शकही होते.




राजीव यांनी अनेक नवीन स्टार्टअप्सना मदत केली. त्यांना सिलिकॉन व्हॅलीमध्ये 'स्टार्टअप जंकी' म्हटले जायचे. पण नियतीला काहीतरी वेगळेच मान्य होते. २००९ मध्ये वयाच्या अवघ्या ४७ व्या वर्षी एका दुर्दैवी अपघातात त्यांचा मृत्यू झाला. त्यांना पोहता येत नव्हते आणि त्यांच्या घराच्या स्विमिंग पूलमध्ये बुडून त्यांचा मृत्यू झाला.

आजही म्हणजे मार्च २०२६ मध्ये राजीव मोटवानी यांचा वारसा तितकाच जीवंत आहे. गेल्या काही दिवसांतच 'मोटवानी जडेजा फाउंडेशन'च्या माध्यमातून 'दावोस २०२६' मध्ये भारतीय तरुण नेत्यांना जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यात आले. इतकेच नाही, तर भारताच्या ओ.पी. जिंदाल ग्लोबल युनिव्हर्सिटीमध्ये ४४ कोटी रुपयांच्या निधीतून 'राजीव मोटवानी इन्स्टिट्यूट फॉर अमेरिकन स्टडीज' सुरू करण्यात आले आहे.

एका शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांना दिलेल्या एका कल्पनेने जगाचे भविष्य बदलले. लॅरी पेज आणि सर्गेई ब्रिन आजही म्हणतात, "आज तुम्ही जे काही तंत्रज्ञान वापरता त्यात कुठेतरी राजीव मोटवानी यांचा छोटासा हिस्सा नक्कीच असतो."

पुढच्या वेळी जेव्हा तुम्ही गुगलवर काहीतरी सर्च कराल, तेव्हा एकदा त्या 'पेजरँक' मागे असलेल्या राजीव मोटवानी यांची आठवण नक्की काढा. कदाचित तुमच्या डोक्यातही एखादी अशीच 'वेडी' कल्पना असेल, जिला फक्त एका योग्य मार्गदर्शकाची गरज आहे. आजच्या या धावपळीच्या युगात, आपल्याकडेही असा एखादा 'राजीव मोटवानी' आहे का, जो आपल्या स्वप्नांना पंख देऊ शकेल?

# राज्यातील लाखो रेशन कार्डस् होणार बंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्य सरकारने रेशन कार्डच्या नियमात मोठे बदल केले आहेत. नुकतेच सरकारकडून रेशन कार्ड पात्रतेबाबत नवीन आणि अत्यंत कडक नियमावली जाहीर करण्यात आली आहे. वन नेशन वन रेशनकार्ड या संकल्पनेला अधिक प्रभावी करण्यासाठी १ एप्रिलपासून रेशन कार्डच्या नियमात मोठे बदल करण्यात येणार आहेत. या नवीन बदलांमुळे देशातील लाखो अपात्र लाभार्थ्यांची नावे रेशन यादीतून कायमची वगळली जाण्याची शक्यता आहे.

केंद्र आणि राज्य सरकारकडून रेशन कार्डसाठी नवीन आणि कडक निकष लागू केले आहेत. यासाठी शासनाने गरजू आणि खऱ्या लाभार्थ्यांनाच मोफत धान्याचा लाभ मिळावा, यासाठी उत्पन्नाची आणि मालमत्तेची मर्यादा निश्चित केली आहे. जर यातील कोणताही एक निकष तुमच्या रेशन कार्ड लागू झाल्यास तुमचे रेशन कार्ड रद्द होऊ शकते.

### नवीन नियम काय?


**उत्पन्न मर्यादा :** शहरी भागातील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास आणि ग्रामीण भागातील कुटुंबाचे उत्पन्न २ लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास ते कुटुंब अपात्र ठरेल.

**चारचाकी वाहन :** ज्या कुटुंबाच्या मालकीची चारचाकी गाडी (कार, ट्रॅक्टर इ.) आहे, त्यांना आता रेशनचा लाभ घेता येणार नाही.

**मालमत्ता :** जर तुमच्याकडे १०० चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्रफळाचा प्लॉट, फ्लॅट किंवा स्वतःचे पक्के घर असेल, तर तुम्ही या योजनेसाठी अपात्र आहात.

**इन्कम टॅक्स :** कुटुंबातील कोणतीही व्यक्ती जर आयकर (इन्कम टॅक्स) भरत असेल, तर त्या संपूर्ण कुटुंबाचे रेशन कार्ड बंद केले जाईल.

**घरातील सुविधा :** ज्यांच्या घरात एसी (एसी) किंवा जनरेटर सारख्या सुखसोयी आहेत, त्यांनाही या यादीतून बाहेर काढले जाणार आहे. त्यासोबतच ई-केवायसी करणे अनिवार्य असणार आहे. यासाठी केवळ नियमच बदलले नाहीत, तर प्रशासकीय प्रक्रियाही कडक करण्यात आली आहे. सर्व रेशन कार्डधारकांना आता



## सरकारकडून पाच मोठे बदल, नवे नियम काय?

ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. जर तुम्ही तुमच्या जवळच्या रेशन दुकानदाराकडे जाऊन आधार पडताळणी केवायसी पूर्ण केली नाही, तर तुमचे रेशन कार्ड तातडीने बंद केले जाईल.

तसेच अनेकजण आपली खरी आर्थिक परिस्थिती लपवून रेशन काचा लाभ घेतात. अशा लोकांसाठी प्रशासनाने कडक इशारा दिला आहे. जर तपासादरम्यान एखादी व्यक्ती चुकीची माहिती देऊन रेशन घेत असल्याचे आढळले, तर केवळ त्याचे रेशन कार्ड रद्द होणार नाही, तर त्याच्याकडून आजवर घेतलेल्या धान्याची वसुली बाजारभावाप्रमाणे केली जाईल. तसेच कायदेशीर कारवाई देखील होऊ शकते. सरकारच्या या निर्णयामुळे खऱ्या अर्थाने गरिबी रेषेखालील आणि गरजू कुटुंबांना धान्याचा पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे. सध्याच्या आकडेवारीनुसार, या नवीन छाननीमुळे देशभरातील सुमारे ७० लाख अपात्र रेशन कार्ड्स बंद होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



**डॉक्टर से आईएएस तक का सफर**

# ‘एआयआर १’ हासिल कर रचा इतिहास

## राजस्थान के डॉ. अनुज अग्निहोत्री बने युपीएससी टॉपर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

युपीएससी सिविल सेवा परीक्षा २०२५ का फाइनल रिजल्ट जारी कर दिया गया है। एमस् जोधपुर से एमबीबीएस करने वाले डॉ. अनुज अग्निहोत्री ने ऑल इंडिया रैंक- १ हासिल कर इतिहास रच दिया। राजस्थान के रावतभाटा के रहने वाले अनुज ने कड़ी मेहनत, अनुशासन और सही रणनीति के दम पर यह सफलता पाई।

### कौन हैं डॉ. अनुज अग्निहोत्री?



अनुज अग्निहोत्री ने युपीएससी सिविल सेवा परीक्षा २०२५ में ऑल इंडिया रैंक-१ (एआयआर-१) हासिल कर देशभर में अपनी अलग पहचान बनाई है। उनकी सफलता हजारों युपीएससी अभ्यर्थियों के लिए प्रेरणा बन गई है। कठिन परिश्रम, अनुशासन और स्पष्ट रणनीति के दम पर उन्होंने देश की सबसे कठिन परीक्षाओं में से एक में शीर्ष स्थान प्राप्त किया।

**सक्सेस स्टोरी**

### साधारण परिवार से है नाता

डॉ. अनुज अग्निहोत्री राजस्थान के छोटे से शहर रावतभाटा के रहने वाले हैं। साधारण परिवार से आने वाले अनुज बचपन से ही पढ़ाई में बेहद मेधावी थे। सीमित संसाधनों के बावजूद उन्होंने अपने लक्ष्य पर ध्यान बनाए रखा और लगातार मेहनत करते हुए इस बड़ी उपलब्धि को हासिल किया।

### डॉ. अनुज ने कहां से की है पढ़ाई ?

डॉ. अनुज अग्निहोत्री ने अपनी मेडिकल पढ़ाई एमबीबीएस के रूप में एमस् जोधपुर से पूरी की। उन्होंने वर्ष २०२३ में ग्रेजुएशन पूरा किया। मेडिकल की पढ़ाई के दौरान ही उन्होंने सिविल सेवा में जाने का लक्ष्य तय कर लिया था और पढ़ाई पूरी करने के बाद उन्होंने युपीएससी की तैयारी शुरू की।

### क्या है डॉ. अनुज का एलन कोटा कनेक्शन

यूपीएसई २०२५ के ऑल इंडिया टॉपर डॉ. अनुज कक्षा १० तक रावतभाटा में पढ़ाई के बाद अनुज कोटा आए। अनुज ने वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ में दो सत्रों तक कोटा में रहकर एलन कॅरियर इंस्टीट्यूट से पढ़ाई की थी। इंस्टीट्यूट से पढ़ाई के बाद उन्होंने २०१७ एम्स में आल इंडिया रैंक- २१५ और नीट-यूजी में आल इंडिया रैक-३०६ प्राप्त की थी। उनके पिता केबी अग्निहोत्री ने एलन से बातचीत में बताया कि कोटा में दो साल का सफर डॉ. अनुज के लिए बहुत प्रेरणादायी रहा और बहुत कुछ सीखा।

### युपीएससी की तैयारी और सफलता की कहानी

डॉ. अनुज की सफलता के पीछे नियमित पढ़ाई, सही रणनीति और निरंतर अभ्यास की बड़ी भूमिका रही। उन्होंने बेसिक किताबों पर मजबूत पकड़ बनाई, समसामयिक घटनाओं पर विशेष ध्यान दिया और लगातार मॉक टेस्ट देकर अपनी तैयारी को बेहतर बनाया। उनका मानना है कि धैर्य, अनुशासन और सही दिशा में मेहनत ही युपीएससी में सफलता की कुंजी है।

### सिविल सेवा परीक्षा के बारे में

युपीएससी द्वारा आयोजित सिविल सेवा परीक्षा तीन फेज प्रारंभिक परीक्षा (प्रिलिम्स), मुख्य परीक्षा (मेनस्) और इंटरव्यू या पर्सनैलिटी टेस्ट में होती है। इन सभी फेज को सफलतापूर्वक पार करने वाले उम्मीदवारों का चयन भारतीय प्रशासनिक सेवा (आईएएस), भारतीय पुलिस सेवा (आयपीएस) और भारतीय विदेश सेवा (आयएफएस) सहित कई प्रतिष्ठित सेवाओं के लिए किया जाता है। परीक्षा के अंतिम परिणाम घोषित होने के बाद उम्मीदवारों के अंक आयोग की आधिकारिक वेबसाइट पर जारी किए जाते हैं।

# कीटकनाशके खाल, कीटकासारखे मराल!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कर्करोग व तत्सम आजारांचे प्रमाण वाढण्याचे मुख्य कारण हे आपले अन्नपदार्थ व जीवनशैली यांच्याशी निगडीत आहे. गेल्या काही वर्षांत लोकांवरील कामाचा ताण, स्पर्धा वाढली आहे. अनेक चिंता वाढल्या आहेत.

भारतामधील शहरी लोकसंख्येपैकी ७८ टक्के लोकांच्या रक्तामध्ये कीटकनाशकांचे अंश आढळून आले. बेंगळुरस्थित गट हेल्थ स्टार्टअप मायक्रोबायो टेक्स यांनी केलेल्या अभ्यासात हे निष्कर्ष काढण्यात आले. विविध शहरांमधील २०० जणांच्या रक्ताचे नमुने तपासण्यात आले. त्यामध्ये कीटकनाशके, प्रतिजैवके, स्टिरॉईडस आणि तथाकथित फॉरएव्हर केमिकल्स यासारख्या छुप्या रासायनिक अंशांचा आरोग्यावर होणारा परिणाम समजून घेण्याचा प्रयत्न केला. दैनंदिन अन्नसेवन, प्लास्टिकचा वापर, भूजल, नॉनस्टिक भांडी, अन्न पॅकेजिंग, जलरोधक कपडे आणि कोटिंग्ज याच्या वापरामुळे हा धोका वाढला आहे.

आपण जेव्हा बाजारात जातो तेव्हा ताजा टवटवीत फ्लॉवर, कोबी पाहिल्यावर किंवा तजेलदार फळे पाहिल्यावर आपले मन प्रफुल्लित होते. अनेकदा भाजीपाला, फळे यांचे उत्पादन वाढावे, त्यावर कीड पडू नये व तो अधिकाधिक आकर्षक दिसावा याकरिता वेगवेगळ्या केमिकल्सचा, कीटकनाशकांचा वापर केलेला असतो. असा भाजीपाला, फळे, डाळी व अन्नपदार्थ दीर्घकाळ खाण्याचे गंभीर परिणाम आपल्या प्रकृतीवर होतात. अनेकदा आपण खाद्यपदार्थ खरेदी करायला जातो तेव्हा सोबत कापडी पिशवी घेऊन जात नाही. प्लास्टिकच्या पिशव्यांत अनेक पदार्थ भरून भाजीवाला अथवा दुकानदार ते आपल्याला देतो. घरी आल्यावर हे पदार्थ साफ करून फ्रीजमध्ये न ठेवता आपण प्लास्टिक पिशवीसकट ठेवतो. काही वेळा तर पुढील चार ते पाच दिवस ते पदार्थ तसेच फ्रीजमध्ये ठेवले जातात. त्यामुळे पिशवीतील प्लास्टिकचे घटक व ते अन्नपदार्थ यांचा सतत संपर्क राहिल्याचे घातक परिणाम आपल्या शरीरावर होतात.



अनेकदा भूक लागल्यावर वेफर्स, शेव याच्या हवाबंद पिशव्या आपण खरेदी करतो. या पिशव्यांच्या वरच्या बाजूला प्रवाह रंगबिरंगी चित्रे असली तरी आतील बाजूला हे वेफर्स, शेव टिकावे याकरिता सिल्व्हर रंगाचे कोटींग असते. दीर्घकाळ अशा पद्धतीच्या पिशव्यांमधील शेव, वेफर्स खाल्ल्याचाही दुष्परिणाम होतो. रेडी टू इट असे खाद्यपदार्थ अशाच पद्धतीच्या पिशव्यांतून विकले जातात. पाणी हा आपल्या शरीराकरिता अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आपल्या घरात येणारे पाणी कसे व कुठून येते यावर आपले आरोग्य अवलंबून आहे. अनेक शहरांना पाणीपुरवठा करणाऱ्या नद्यांमध्ये त्या काठावरील कारखान्यातील सांडपाणी, रासायनिक पाणी सोडले जाते. यावर लक्ष देणारी सक्षम यंत्रणा आपल्याकडे नाही. सांडपाणी आपल्याला थोडीफार शुद्धीकरण प्रक्रिया करून पुरवले जाते. या पाण्यातील रासायनिक अंश जर पूर्णतः काढला गेला नसेल तर वेगवेगळे आजार होऊ शकतात. फ्रीजमध्ये दीर्घकाळ मांसाहारी पदार्थ ठेवले तर त्यांच्या सेवनामुळे माणसाच्या शरीरावर घातक परिणाम होतात. नॉनस्टिक भांड्यांचा कोटिंग्ज, जलरोधक कपडे हे आकर्षक दिसत असले तरी त्याच्या सतत व वरचेवर वापरामुळे त्यावरील कोटिंग्ज आपल्या जेवणातून पोटात जाते व हानी पोहोचविते. किरकोळ कारणाकरिता स्वतःहून अँटीबायोटिक्स (प्रतिजैविके) घेण्याकडे कल वाढला आहे. प्रत्येक व्यक्तीकरिता प्रतिजैवकांचा किती डोस द्यायचा हे खरेतर डॉक्टरांनी निश्चित करणे गरजेचे आहे. मात्र मेडिकल स्टोर्समधून औषधे खरेदी करुन ती घेतली जातात. त्यामुळेही आरोग्याचे धोके वाढले आहेत.


# महाराष्ट्राची ‘अस्मिता’ जतन करणारे ‘वसंतदादा’

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

वसंतदादांचे घराणे मूळचे तुळजापूरचे. त्यांचे मूळ आडनाव कदम आणि ते घराणे तुळजाभवानीचे मानकरी होते. त्यांची सहावी पिढी सांगली जिल्ह्यातील पद्माळे या कृष्णा नदीकाठच्या गावी स्थलांतरित झाली व तेथेच शेती करू लागली. पुढे गावची पाटीलकीही त्यांच्याकडे आली आणि आडनावही पाटील हेच रूढ झाले. दादांचे आजोळ जुन्या कोल्हापूर संस्थानातील कागल येथील जगदाळे या कुटुंबातील. १३ नोव्हेंबर १९१७ रोजी दादांचा जन्म कोल्हापुरातील मंगळवार पेठेत दिवाळीच्या अमावास्येच्या दिवशी झाला. त्यांचे मूळ नाव ‘यशवंत’ होते. पण नंतर त्यांचे ‘वसंत’ हे नाव रूढ झाले व पुढे वसंत बंडू पाटील हे महाराष्ट्राचे ‘वसंतदादा’ झाले.

दादांचा जीवनकार्यकाल देशाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिवर्तनाचा काळ होता. त्या परिवर्तनाला सामोरे जाताना समाजहित आणि बदलत्या काळाची मागणी यांची अचूक सांगड घालून भविष्याचा वेध घेणे हे खूप मोठे आव्हान होते. हे आव्हान पेलण्यात ते यशस्वी झाले आणि म्हणूनच जनमानसात ‘दादा’ ही उपाधी प्राप्त करू शकले. ग्रामीण विकासाचे मर्म अचूक जाणणारा, सहकार चळवळ गाव पातळीवर पोहोचविणारा, सर्वसामान्यांशी अतूट नाळ जोडू शकलेला, लोकांच्या हृदयात स्थान निर्माण करणारा सच्चा लोकनेता, आपल्या तात्त्विक भूमिकेसाठी मुख्यमंत्रिपदावरही क्षणात पाणी सोडून महाराष्ट्राच्या खऱ्या अस्मितेचे दर्शन घडविणारा कणखर नेता, अल्पशिक्षित असूनही तब्बल चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषविणारा आणि यशस्वी राजकारणी आणि विनाअनुदानित शिक्षण क्षेत्राची द्वारे खुली करणारा अशी स्वर्गीय वसंतदादा पाटील यांची ओळख उभ्या महाराष्ट्राला आहे. विशेषतः एक धुरंधर, मुत्सद्दी आणि लोकप्रिय राजकारणी म्हणूनही वसंतदादा ओळखले गेले. १९९० च्या दशकानंतरच्या पिढ्यांना मात्र त्यांच्याबद्दल किती माहिती आहे, हा संशोधनाचाच विषय ठरावा. राजकीय कार्यकर्ते-नेत्यांनाही ‘शरद पवार आणि ‘पाठीत खंजीर खुपसणे’ या ऐतिहासिक राजकीय वादापलीकडचे वसंतदादा फारसे माहीत नाहीत.

सोलापूरच्या चार हुतात्म्यांच्या बलिदानाची प्रेरणा घेऊन त्यांनी स्वातंत्र्यसंग्रामात बालवयातच उडी घेतली. पुढे १९४१ चा बिसूरचा सत्याग्रह असो वा त्यानंतर आक्रमक बनून रेल्वे लुटण्यापासून इंग्रजांवर हल्ले करण्याच्या अनेक क्रांतिकारी मोहिमा त्यांनी राबविल्या. सांगली संस्थानचा जेल फोडून ते आपल्या क्रांतिकारी सहकाऱ्यांसह तुरुंगातून पळाले. इंग्रज पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला. त्या पाठलागात त्यांच्यावर झालेल्या गोळीबारात ते जखमी झाले होते. अशा या धाडसी क्रांतिकारकाने स्वातंत्र्यानंतर आपले जीवन विधायक कार्यासाठी वाहिले. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून देऊन इंग्रजांच्या गोळ्या झेलणाऱ्या या क्रांतिकाऱ्यांची ती ओळख ठळकपणे झालीच नाही. वसंतदादांचा जीवन कार्यकाल हा देशाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांतील परिवर्तनाचा काळ होता. त्या परिवर्तनाला सामोरे जाताना समाजहित आणि बदलत्या काळाची मागणी यांची अचूक सांगड घालून भविष्याचा वेध घेणे हे खूप मोठे आव्हान होते. हे आव्हान पेलण्यात ते यशस्वी झाले आणि म्हणूनच लोकांच्या हृदयसिंहासनावर ‘दादा’ ही उपाधी प्राप्त करू शकले. स्वातंत्र्यपूर्व काळात देशप्रेमाने झपाटलेला आक्रमक, कठोर, धाडसी आणि छातीवर इंग्रजांच्या गोळ्या झेलणारा क्रांतिकारक, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोककल्याणाशी स्वतःची नाळ जोडून विकासाची नवनवी दालने शोधण्यासाठी सतत धडपडणारा संयमी समाजसेवक, स्वातंत्र्यानंतरच्या प्रारंभीच्या काळात देशाच्या व महाराष्ट्राच्या राजकारणाला ‘नवा चेहरा’ प्राप्त होत असताना स्वतः सत्तेत वाटेकरी न राहता विकास आणि पक्षसंघटना सामर्थ्यशाली बनविण्यासाठी जीवाचे रान करणारा सच्चा कार्यकर्ता आणि त्यानंतरच्या काळाने जन्माला घातलेल्या सत्ता आणि राजकारणातील नव्या संस्कृतीत स्वतःची आणि महाराष्ट्राची ‘अस्मिता’ जतन करणारा कणखर, मुरब्बी आणि दिलदार राजकारणी... सार्वजनिक जीवनातील अशा विविध भूमिकांना दादांनी पुरेपूर न्याय दिला. तो देत असताना दुटप्पीपणा आणि कावेबाजपणाला त्यांनी आपल्या बंधुतुल्य मित्र, नेते आणि लाडके ‘साहेब’ यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी आणि राजीव गांधींसारख्या नेत्यांशी ज्या-ज्या वेळी संघर्षाचे प्रसंग उद्‌भवले, त्या-त्या वेळी ते त्या प्रसंगांना सहज सामोरे गेले. महाराष्ट्राच्या इतिहासात १९७८ हे वर्ष ‘पाठीत खंजीर खुपसणे’ या वाक्प्रचाराने गाजले. पण प्रत्यक्ष दादांनी मात्र स्वतः त्या वाक्प्रचाराचा कधीही आणि कुठेही प्रयोग केला नाही.



एकूणच संघर्ष आणि मतभेद बाजूला ठेवून आणि प्रेम, आपलेपणा व विश्वासाने बेरजेच्या राजकारणाची कास त्यांनी आयुष्यभर धरली. सहकार, कृषी, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात क्रांतिकारी कार्य उभे करीत असताना सामान्य माणसांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते कधीही ढळणार नाही, याची काळजी त्यांनी जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत वाहिली. स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारी स्वातंत्र्योत्तर काळात सहकार क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या वसंतदादांनी काँग्रेसची प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रीय सरचिटणीस यांसारखी पदे समर्थपणे पेलली. ते राजस्थानचे राज्यपालही होते. आपल्या भूमिकेशी ठाम राहताना त्यांनी राजकीय संन्यास घेण्यासही मागे-पुढे पाहिले नाही. शालिनीताई पाटील यांच्याशी झालेल्या विवाहावरून उठलेल्या वादळाची देखील त्यांनी तमा बाळगली नाही. प्रकृती साथ देत नसतानाही ते कार्यकर्त्यांच्या प्रेमापोटी १९८९ साली एका कार्यक्रमासाठी सोलापूरला गेले व व्यासपीठावरच त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तातडीने मुंबईला हलविण्यात आले. तेथेच उपचार सुरू असताना १ मार्च १९८९ रोजी ते कालवश झाले. सिंचन घोटाळा नव्हे बचत !ग्रामविकास, सहकार आणि सिंचन हे दादांचे जिव्हाळ्याचे विषय. ते पाटबंधारेमंत्री असताना जायकवाडी प्रकल्पात काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ऐतिहासिक कामगिरी बजावली होती. प्रकल्पाची कामे वेळेत आणि काटेकोरपणे केल्याने खर्चात त्यावेळी १६ टक्के बचत झाली आणि शासनाचे २ कोटी ७० लाख रुपये वाचले. दादांनी त्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना चार लाख रुपयांची बक्षिसे देऊन गौरविले होते. सिनेमाची आवड. वसंतदादा आणि शालिनीताई या दोघांनी मिळून ‘क्लिओपात्रा’ हा सिनेमा मुंबईच्या इरॉस सिनेमागृहात पाहिला. त्यावेळी त्यांच्यासोबत वारणा उद्योग समूहाचे जनक तात्यासाहेब कोरे आणि आबासाहेब खेबूडकरही होते.

मदर इंडिया, मुघल-ए-आझम, ममता हे दादांचे विशेष आवडते चित्रपट. जीवंतपणी पुतळा १० मे १९७८ रोजी सांगलीच्या बाजार समिती आवारात वसंतदादा पाटील यांच्या पुतळ्याचे अनावरण त्यांच्याच उपस्थितीत यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. दादा आणि टुरिंग टॉकीज दादांनी काही काळ कॉन्ट्रॅक्टरकडे रोड कारकुनाची नोकरीही केली होती. त्या काळात त्यांचे मामा जगदाळे-पाटील हे टुरिंग टॉकीज चालवीत असत. त्याही कामासाठी दादांनी अनेक गावांची पायपीट केली होती.दादांनी चहा सोडला. सोलापूरच्या चार हुतात्म्यांना फाशी दिल्याचे वृत्त समजताच १३ वर्षांच्या वसंतदादांनी चहा पिणे सोडण्याचा निर्णय घेतला व तेथूनच ते स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी सांगलीत झेंडावंदन करून त्यांनी पुन्हा चहा घेतला.

# २५ व्या वर्षी दिसू लागाल ५५ चे

## जर सोडल्या नाहीत सकाळच्या ‘या’ सवयी...

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सकाळच्या काही गोष्टी या फक्त तुमचा दिवस कसा जाणार, हे नाही तर तुमच्या आरोग्यासाठी महत्त्वाचा असतो. मात्र बरेच लोक असे असतात, की जे विचार न करता अशा गोष्टी अंगीकारतात ज्यामुळे हळूहळू तुमचे शरीर आणि चेहऱ्याचे वय वाढवते. होय काही छोट्या-छोट्या गोष्टी तुम्हाला कमी वयातच वृद्धावस्थेकडे नेतात. त्यामुळे हे जाणून घेणे आवश्यक आहेत. या सकाळच्या सवई कोणत्या आहेत? अशावेळी आम्ही तुम्हाला अशा ५ सवयी सांगतो, ज्या करण्यापासून तुम्ही दूर राहिले पाहिजे.

### नाश्ता न करणे

अनेक लोक गडबडीत सकाळचा नाश्ता करणे टाळतात. त्यामुळे स्ट्रेस हार्मोन्स वाढतात आणि एनर्जी कमी होते. जास्त काळ असे केल्याने तुम्ही थकू शकता.



त्वचाही कोरडी-कोरडी होते.

### सकाळी उठल्यावर फोन पाहणे

बरेच लोक सकाळी उठल्यावर पहिला फोनवर न्यूज, सोशल मीडिया, ई-मेल चेक करतात. त्यामुळे मेंदू आणि मूड स्ट्रेस निर्माण होऊ शकतो.

### पाणी न पिताच कॉफी पिणे

रात्रभर झोपल्यानंर शरीर डिहायड्रेट असते. त्यामुळे शरीराला पाण्याची गरज असते. असे न करता बरेच लोक कॉफी-चहा पितात. जे शरीर आणि त्वचेसाठी चांगले नाही.

### व्यायाम न करणे

सकाळी स्ट्रेचिंग आणि हलका व्यायाम करणे ब्लड शर्क्युलेशन होते आणि मूड चांगला राहतो. सूर्यप्रकाश घेणे हेही चांगले आहे. यामुळे शरिराचे घड्याळ सुव्यवस्थित राहाते.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# महामृत्युंजय मंत्र की रचना कैसे हुई ?

## किसने की महामृत्युंजय मंत्र की रचना ? जाने इसकी शक्ति

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शिवजी के अनन्य भक्त मृकण्ड ऋषि संतानहीन होने के कारण दुखी थे, विधाता ने उन्हें संतान योग नहीं दिया था। मृकण्ड ने सोचा कि महादेव संसार के सारे विधान बदल सकते हैं, इसलिए क्यों न भोलेनाथ को प्रसन्नकर यह विधान बदलवाया जाए। मृकण्ड ने घोर तप किया, भोलेनाथ मृकण्ड के तप का कारण जानते थे इसलिए उन्होंने शीघ्र दर्शन न दिया लेकिन भक्त की भक्ति के आगे भोले झुक ही जाते हैं। महादेव प्रसन्न हुए उन्होंने ऋषि को कहा कि मैं विधान को बदलकर तुम्हें पुत्र का वरदान दे रहा हूं लेकिन इस वरदान के साथ हर्ष के साथ विषाद भी होगा।

भोलेनाथ के वरदान से मृकण्ड को पुत्र हुआ जिसका नाम मार्कण्डेय पड़ा। ज्योतिषियों ने मृकण्ड को बताया कि यह विलक्ष्ण बालक अल्पायु है, इसकी उम्र केवल १६ वर्ष है। ऋषि का हर्ष विषाद में बदल गया, मृकण्ड ने अपनी पत्नी को आश्वत किया- जिस ईश्वर की कृपा से संतान हुई है वही भोले इसकी रक्षा करेंगे, भाग्य को बदल देना उनके लिए सरल कार्य है। मार्कण्डेय बड़े होने लगे तो पिता ने उन्हें शिवमंत्र की दीक्षा दी। मार्कण्डेय की माता बालक के उम्र बढ़ने से चिंतित रहती थी। उन्होंने मार्कण्डेय को अल्पायु होने की बात बता दी। मार्कण्डेय ने निश्चय किया कि माता-पिता के सुख के लिए उसी सदाशिव भगवान से दीर्घायु होने का वरदान लेंगे जिन्होंने जीवन दिया है, सोलह वर्ष पूरे होने को आए थे। मार्कण्डेय ने शिवजी की आराधना के लिए महामृत्युंजय मंत्र की रचना की और शिव मंदिर में बैठकर इसका अखंड जाप करने लगे।

**ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम्।**
**उर्वारुकमिव बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मामृतात्॥**

समय पूरा होने पर यमदूत उन्हें लेने आए, यमदूतों ने देखा कि बालक महाकाल की आराधना कर रहा है तो उन्होंने थोड़ी देर प्रतीक्षा की। मार्केण्डेय ने अखंड जप का संकल्प लिया था। यमदूतों का मार्केण्डेय को छूने का साहस न हुआ और लौट गए। उन्होंने यमराज को बताया कि वे बालक तक पहुंचने का साहस नहीं कर पाए। इस पर यमराज ने कहा कि मृकण्ड के पुत्र को मैं स्वयं लेकर आऊंगा. यमराज मार्कण्डेय के पास पहुंच गए। बालक मार्कण्डेय ने यमराज को देखा तो जोर-जोर से महामृत्युंजय मंत्र का जाप करते हुए शिवलिंग से लिपट गया। यमराज ने बालक को शिवलिंग से खींचकर ले जाने की चेष्टा की तभी जोरदार हुंकार से मंदिर कांपने लगा। एक प्रचण्ड प्रकाश से यमराज की आंखें चौधियां गईं। शिवलिंग से स्वयं महाकाल प्रकट हो गए। उन्होंने हाथों में त्रिशूल लेकर यमराज को सावधान किया और पूछा तुमने मेरी साधना में लीन भक्त को खींचने का साहस कैसे किया? यमराज महाकाल के प्रचंड रूप से कांपने लगे। उन्होंने कहा- प्रभु मैं आप का सेवक हूं. आपने ही जीवों से प्राण हरने का निष्ठुर कार्य मुझे सौंपा है। भगवान चंद्रशेखर का क्रोध कुछ शांत हुआ तो बोले- मैं अपने भक्त की स्तुति से प्रसन्न हूं और मैंने इसे दीर्घायु होने का वरदान दिया है। तुम इसे नहीं ले जा सकते। यम ने कहा- प्रभु आपकी आज्ञा सर्वोपरि है. मैं आपके भक्त मार्कण्डेय द्वारा रचित महामृत्युंजय का पाठ करने वाले को त्रास नहीं दूंगा। महाकाल की कृपा से मार्केण्डेय दीर्घायु हो गए। उनके द्वारा रचित महामृत्युंजय मंत्र काल को भी परास्त करता है।

**॥ जय श्री महाकाल ॥**





# देव भक्तीचा भुकेला!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भक्तीमार्गात असो नसो. रोजच्या दैनंदिन जीवनात प्रत्येकालाच भक्ती, जप-तप नामस्मरण जमत नाही. कित्येक लोक आहेत त्यांच्यापाठी कामाचा, जबाबदारीचा व्याप असतो की स्वतःसाठी त्यांना वेळही नसतो. अशात काही अडचणी आल्या तर ते कुणाचे तरी मार्गदर्शन घ्यायला जातात आणि एखाद्याला संचार वगैरे असेल, आध्यात्मिक अनुभूती असेल तर मार्गदर्शक त्यांना सरळ गुरू करायला लावतात, देव घ्यायला लावतात, पण खरोखर याची गरज आहे का? अजिबात नाही. देव भक्तीचा भुकेला असतो. त्याला सोंग-ढोंगांची गरज नसते. हे आपल्या मांडणुकी आहेत, आपले विचार आहेत, ज्यांना जमत नसेल त्यांना साधारण मार्ग देता येतात, ज्यांना देव्हारा चालवायचा नसेल पण अडचणी असतील त्यांचे मार्ग खुले करून संचार बंदही केला जातो. जेणेकरून त्रास होणार नाही. शिक्षण किंवा नोकरी याही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे देवाच्या नावाखाली याकडे दुर्लक्ष करणे चूक आहे. कोणाला भक्तीची आवड असेल, तर साधारण आपल्या कुलदेवीचा कलश घरात भरून ठेवा. दिवा अगरबत्ती करा. बाकी काही जमत नसेल तर कर्मकांड त्यावेळी केले जायचे जेव्हा आपले पूर्वज होते. आता विज्ञानवादी जग आहे. या गोष्टींचा उपयोगसुद्धा जगाला पुढे नेण्यासाठी करा. एकमेकांच्या मदतीसाठी करा. माणुसकी जपण्यासाठी करा. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू नेहमीच असतात आणि प्रत्येक गोष्टीला सकारात्मक गोष्टीने बघत चला. आपल्या आजूबाजूच्या गोष्टी काळ-वेळ वास्तू आपल्याला नेहमीच 'तथास्तु' म्हणत असते म्हणून नेहमी सकारात्मक उर्जेत राहा. जेणेकरून नकारात्मक गोष्टी आपल्यापासून दूरच राहतील.

# बिजली महादेव : जेथे दर १२ वर्षांनी प्रत्यक्ष आकाश नतमस्तक होते...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




तुम्हाला माहिती आहे का? मनालीमध्ये एक असे मंदिर आहे जेथे दर १२ वर्षांनी प्रत्यक्ष आकाश विजेच्या रूपाने जमिनीवर उतरते आणि महादेवाच्या चरणी नतमस्तक होते. हिमाचल प्रदेशातील कुल्लू-मनालीच्या उत्तुंग पर्वतशिखरांवर, जेथे ढग जमिनीला स्पर्श करतात, तेथे वसलेले 'बिजली महादेव' हे मंदिर केवळ एक धार्मिक स्थळ नसून निसर्गाच्या एका अशा अनाकलनीय चमत्काराचे केंद्र आहे, ज्याचे उत्तर विज्ञानाकडेही नाही. समुद्रसपाटीपासून सुमारे २४६० मीटर उंचीवर असलेल्या या मंदिराचा इतिहास आणि त्याभोवती गुंफलेली पौराणिक कथा वाचताना आजही अंगावर शहारे येतात. ही घटना केवळ योगायोग नसून त्यामागे एक प्राचीन आणि तितकीच रंजक कथा दडलेली आहे, जी आजही स्थानिक लोकांच्या श्रद्धेचा आधार आहे.

पौराणिक कथेनुसार प्राचीन काळी कुल्लू खोऱ्यात 'कुलान्त' नावाचा एक महाकाय आणि क्रूर राक्षस राहत होता. हा राक्षस इतका मायावी होता की तो कोणत्याही रूपाने कोणालाही फसवू शकत असे. एकदा त्याने स्वतःच्या विशाल शरीराने अजगराचे रूप घेतले आणि बियास नदीचा प्रवाह रोखून धरला. त्याचा उद्देश हा होता की संपूर्ण खोरे पाण्याखाली जावे आणि तिथली सर्व जीवसृष्टी नष्ट व्हावी, जेणेकरून तो तिथे आपले साम्राज्य निर्माण करू शकेल. भगवान शिव हे आपल्या भक्तांचे हे संकट पाहून अत्यंत अस्वस्थ झाले. त्यांनी या जगाचे रक्षण करण्यासाठी कुलान्त राक्षसाचा नाश करण्याचा निर्णय घेतला. महादेवांनी एका युक्तीने त्याच्या जवळ जाऊन त्याच्या कानात ओरडून सांगितले की, 'कुलान्त, तुझ्या शेपटीला आग लागली आहे!' राक्षसाने घाबरून जसे मागे वळून पाहिले, तसे महादेवाने आपल्या त्रिशूळाने त्याच्यावर प्रहार करून त्याचा वध केला. असे मानले जाते की, या राक्षसाचे विशाल शरीर ज्या ठिकाणी पडले, तिथेच आजची कुल्लू घाटी वसलेली आहे. आजही तिथल्या नागमोडी डोंगररांगांकडे पाहिल्यास झोपलेल्या अजस्त्र राक्षसाचा भास होतो असे स्थानिक लोक पिढ्यानपिढ्या सांगत आले आहेत.

राक्षसाचा अंत झाला, पण महादेवाच्या मनात जगाच्या रक्षणाची एक चिंता होती. या परिसरावर भविष्यात पुन्हा कोणतेही संकट येऊ नये आणि इथली ऊर्जा संतुलित राहावी म्हणून त्यांनी आकाशातील इंद्राला आज्ञा दिली, की दर १२ वर्षांनी येथे वीज कोसळावी. यामागचे कारण अत्यंत हृदयस्पर्शी आणि मानवीय भावनांनी ओतप्रोत भरलेले आहे. भगवान शिव जगाचे कल्याण करण्यासाठी आणि सृष्टीला कोणतीही हानी पोहोचू नये म्हणून ही विनाशकारी आणि प्रचंड ऊर्जेची वीज स्वतःच्या शरीरावर झेलतात. जेव्हा ही वीज मंदिरातील शिवलिंगावर पडते, तेव्हा त्या प्रचंड आवाजाने आणि प्रकाशझोताने अवघा परिसर उजळून निघतो आणि शिवलिंगाचे अक्षरशः तुकडे-तुकडे होतात. ही घटना म्हणजे ईश्वराची मानवाप्रती असलेली खरी करुणा आणि जगाच्या कल्याणासाठी स्वतःला झिजवण्याच्या त्यागाचे सर्वोच्च प्रतीक आहे.

विजेच्या या प्रहारानंतरची प्रक्रिया तर आणखीनच विलोभनीय आणि भक्तांची श्रद्धा वृद्धिंगत करणारी असते. शिवलिंगाचे तुकडे झाल्यावर मंदिराचे मुख्य पुजारी ते सर्व तुकडे मोठ्या भक्तीभावाने आणि ममतेने गोळा करतात. त्यानंतर, गायीच्या शुद्ध लोण्याचा (माखन) लेप लावून आणि सत्तूच्या साहाय्याने ते तुकडे पुन्हा जोडले जातात. काही दिवसांनंतर आश्चर्यकारकपणे ते शिवलिंग पुन्हा आपल्या मूळ घट्ट आणि अखंड रूपात येते, जणू काही तिथे कधी तडाच गेला नव्हता. म्हणूनच या मंदिराला 'बिजली महादेव' असे नाव पडले आहे. या मंदिरात पोहोचण्यासाठी भक्तांना सुमारे ३ ते ४ किलोमीटरची कठीण चढाई करावी लागते, पण जेव्हा वर पोहोचल्यावर महादेवाचे दर्शन होते आणि सभोवतालचे विहंगम दृश्य दिसते, तेव्हा सर्व थकवा कुठल्या कुठे पळून जातो. विश्वासाच्या या धाग्याने बांधलेली ही कथा आपल्याला शिकवते की, संकटे कितीही मोठी असली तरी निसर्ग आणि ईश्वर कोणत्या ना कोणत्या रूपात आपले रक्षण करतच असतात. मनालीच्या शांत वातावरणात आणि शुभ्र ढगांच्या कुशीत वसलेले हे मंदिर आजही भक्ती, श्रद्धा आणि निसर्गाच्या अतुट नात्याची जिवंत साक्ष देत जगाला स्तिमित करत उभे आहे. तुमच्याही आजूबाजूला अशा काही घटना घडतात का ज्या आपल्याला आध्यात्मिक दृष्टिकोनातून थक्क करतात?


# भगवान परशुरामांनी वसवलेले 'महाक्षेत्रम' : महादेवाच्या रौद्र रूपाला शांत करणारे अद्भुत 'घृत शिवलिंग'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात अशी अनेक रहस्यमयी मंदिरे आहेत, जी विज्ञानालाही थक्क करतात आणि थेट ईश्वराची प्रचिती देतात. त्यापैकीच एक अद्भुत आणि साक्षात शिवशंकराच्या चैतन्याचा अनुभव देणारे स्थान म्हणजे केरळच्या त्रिशूर शहराच्या मध्यभागी एका उंच टेकडीवर वसलेले प्राचीन 'वडक्कुन्नाथन मंदिर'. हे केवळ दगडांनी बांधलेले असले तरीही, तर येथील कण न् कण एका जीवंत आध्यात्मिक उर्जेने भारलेला आहे.

आपल्या पौराणिक कथांमध्ये असा उल्लेख आहे, की जेव्हा भगवान परशुरामांनी पृथ्वी २१ वेळा निक्षत्रिय केली तेव्हा त्या कर्माच्या प्रायश्चित्तासाठी त्यांनी स्वतःच्या परशूने समुद्रातून काही भूमी वर काढली. ही नवीन भूमी पवित्र आणि राहण्यायोग्य करण्यासाठी त्यांनी भगवान शिवशंकराची अत्यंत कठोर तपश्चर्या केली. त्यांच्या या अथांग भक्तीने प्रसन्न होऊन महादेव, माता पार्वती आणि श्री गणेशासह तेथे प्रकट झाले. ज्या ठिकाणी भगवान शिव प्रथम स्थिरावले, तेथेच परशुरामांनी या भव्य मंदिराची स्थापना केली. आज स्थानिक लोक या पवित्र स्थानाला 'महाक्षेत्रम' (एक विशाल आणि अत्यंत पवित्र मंदिर) मानतात. येथील मुख्य देवतेचे नाव अत्यंत गोड आणि अर्थपूर्ण आहे- 'वडक्कुन्नाथन' म्हणजेच उत्तर दिशेचा स्वामी.

पण या मंदिराला संपूर्ण जगात वेगळे ठरविणारी एक अजब आणि थक्क करणारी परंपरा आहे. ती म्हणजे येथील शिवलिंगावर वर्षानुवर्षे केला जाणारा 'नेय्य अभिषेक' अर्थात शुद्ध तुपाचा अभिषेक. आता तुम्ही म्हणाल, की यात एवढे काय विशेष? पण थांबा, यामागे एक अत्यंत विस्मयकारक कथा दडली आहे. असे मानले जाते, की जेव्हा भगवान शिव येथे परशुरामांसाठी प्रकट झाले तेव्हा त्यांचे ते रूप अत्यंत उग्र, 'रौद्र' आणि अग्नीसमान उष्ण होते. हे शिवलिंग मुळात 'अग्नी' तत्त्वाचे प्रतीक मानले गेले. त्यांच्या अंगातून निघणारी



ती प्रखर ऊर्जा आणि उष्णता इतकी भयानक होती, की ती शांत करून सृष्टीचा समतोल राखण्यासाठी स्वतः भगवान परशुरामांनी महादेवाला शीतल अशा शुद्ध तुपाचा अभिषेक घालायला सुरूवात केली. तूप हे शीतलतेचे प्रतीक असल्यामुळे भगवान शिव यांची ती दाहकता शांत करण्यासाठी ही प्रथा सुरू झाली. आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल, गेल्या अनेक शतकांपासून आजतागायत ही परंपरा न चुकता दररोज पाळली जाते. पण खरा चमत्कार तर पुढेच आहे. केरळसारख्या उष्ण हवामानात, अगदी कडक उन्हाळ्यातही या शिवलिंगावर साचलेले तूप कधीही वितळत नाही, की त्याला कसलीही दुर्गंधी येत नाही.

आजच्या घडीला तेथे मूळ शिवलिंग भाविकांच्या डोळ्यांना दिसतच नाही; कारण त्यावर अभिषेक केलेल्या तुपाचा तब्बल १० ते १२ फूट उंचीचा एक प्रचंड पांढराशुभ्र डोंगर तयार झाला आहे. स्थानिक लोक याला अतिशय आदराने 'घृत शिवलिंग' किंवा 'नेय्य पर्वतम' (तुपाचा डोंगर) म्हणतात. विज्ञानाने कितीही प्रगती केली असली, तरी एवढी वर्षे नैसर्गिकरीत्या तूप न खराब होण्याचे हे रहस्य अजूनही उलगडलेले नाही. भक्तांसाठी मात्र हे साक्षात महादेवाचे जीवंत चैतन्य आहे. वर्षानुवर्षे साचून हे तूप पाषाणासारखे घट्ट होते आणि त्याचा वापर एक अतिशय प्रभावी आयुर्वेदिक औषध म्हणून केला जातो. अनेक असाध्य आजारांवर उपचार म्हणून देशभरातून आलेले भाविक हे 'प्रसाद'रूपी तूप अत्यंत श्रद्धेने आपल्या घरी घेऊन जातात.

केवळ अध्यात्मच नव्हे, तर या मंदिराची वास्तुकला पाहताना आपण अक्षरशः हरवून जातो. केरळच्या पारंपरिक 'तच्चू शास्त्र' (वास्तुकला शास्त्र) मधील प्राचीन कौशल्याचा हा एक अप्रतिम नमुना आहे. मंदिराच्या मध्यभागी असलेले वर्तुळाकार 'श्रीकोविल' (गर्भगृह) आणि त्यावर असलेले तांब्याच्या पत्र्यांचे छप्पर मन मोहून घेते. मंदिराच्या चारही दिशांना उभी असलेली भव्य 'गोपुरम' (प्रवेशद्वारे) केरळच्या वैशिष्ट्यपूर्ण उतरत्या छपराच्या शैलीत दिमाखात उभी आहेत. मंदिराच्या भिंतींवर नजर टाकली की १७ व्या आणि १८ व्या शतकातील अत्यंत दुर्मिळ अशी 'चुवर चित्रंगल' (भित्तीचित्रे) पाहायला मिळतात. यात रामायण आणि महाभारतातील प्रसंग इतक्या बारकाव्याने रंगवले आहेत की ते हुबेहूब सजीव वाटतात. या ऐतिहासिक वारशाचे महत्त्व ओळखूनच 'युनेस्को'ने या चित्रांच्या आणि वास्तूच्या संवर्धनासाठी विशेष सन्मान दिला आहे. याच आवारात एक भव्य 'कूथंबलम' म्हणजेच प्राचीन नाट्यगृह आहे. जेथे लाकडावरील कोरीव कामाचा जगातील सर्वोत्तम आविष्कार पाहायला मिळतो आणि तेथे 'चाक्यार कूथू' ही प्राचीन पारंपारिक कथाकथन कला सादर केली जाते. या पवित्र वास्तूत प्रवेश करण्यासाठी आजही प्राचीन काळापासून चालत आलेले नियम अत्यंत काटेकोरपणे पाळले जातात. येथील 'शुद्धी' आणि पावित्र्य जपण्यासाठी पुरुषांना वरचे कपडे काढून केवळ 'मुंडू' (धोतर) नेसूनच दर्शन घ्यावे लागते, तर महिलांसाठी साडी किंवा लांब स्कर्ट अनिवार्य आहे.

या मंदिराचा आणि केरळच्या संस्कृतीचा अनुभव खऱ्या अर्थाने पूर्ण होतो तो जगातील सर्वांत मोठा उत्सव मानल्या जाणाऱ्या 'त्रिशूर पूरम'मध्ये. याच मंदिराच्या विस्तीर्ण मैदानावर (मैदानम) जेव्हा ३० हून अधिक सजवलेले 'आना' (हत्ती) डौलाने उभे राहतात आणि 'पंचवाद्यम' व 'इलान्जीथरा मेलम'चा (वाद्यांचा गजर) नाद घुमू लागतो, तेव्हा माणसाचे मन एका वेगळ्याच ब्रह्मांडात भ्रमण करते. हत्तींच्या पाठीवरून रंगीबेरंगी 'मुथुक्कूडा' (छत्र्या) बदलण्याचा तो दिमाखदार सोहळा डोळ्यांचे पारणे फेडणारा असतो. हे सर्व पाहताना आणि वाचताना मला आपल्या समृद्ध आध्यात्मिक परंपरेची प्रकर्षाने आठवण येते; जेथे भक्ती, विज्ञान आणि संस्कृती यांचा असाच एक सुंदर आणि अतूट संगम पाहायला मिळतो. वडक्कुन्नाथन मंदिरात साचलेला तो तुपाचा डोंगर आपल्याला एक मोठा निसर्गनियम आणि तत्त्वज्ञान शिकवतो, की ऊर्जा कधीच नष्ट होत नाही, ती फक्त तिचे स्वरूप बदलते. शिवशंकरांची ती उग्र आणि तीव्र ऊर्जा आज त्या तुपाच्या शीतलतेत अगदी शांतपणे सामावून गेली आहे. तेथे जाणारा प्रत्येक भाविक त्या पवित्र तुपाच्या सुगंधात स्वतःला विसरून जातो आणि महादेवाच्या त्या अत्यंत शांत, सौम्य रूपाची प्रचिती घेतो. भारतीय संस्कृती, अफाट निसर्ग आणि मानवी श्रद्धा कशी एकरूप होऊ शकते, हे समजून घेण्यासाठी आणि आयुष्यात एकदा तरी या अद्भुत रहस्याचा अनुभव घेण्यासाठी वडक्कुन्नाथन मंदिराला नक्की भेट द्यायला हवी.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**